## (2) सर्वनामे

**प्राकृत, संस्कृत व मराठीतील तुलनात्मक अशी सर्वनामे पुढीलप्रमाणे दिलेली आहेत.**

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | अहं, हं (अहम्) मी | वयं, अम्हे (वयम्, आवाम्) आम्ही |
| द्वि. पु. | तुं, तुमं (त्वम्) तू | तुम्हे, तुज्झे (युवाम्) तुम्ही |
| तृ. पु. | सो (सः) तो | ते (तौ) ते |
| | सा (सा) ती | ता (ताः) त्या |
| | तं (तत्) ते | ताणि (तानि) ती |

को = कोण (पुं.)

काइं = कोणती

का = कोण (स्त्री), के = कोणते

तव = तुझा, तुझी, तुझे

मम = माझा, माझी, माझे

केरिसं = कशा प्रकारे

इमो, एसो = हा (पुं.)

इमं = हे (न.पुं.)

एए = (पुं.) हे

इमा, एसा = (स्त्री) ही

इमाइं = ही (स्त्री)

एयस्स = याचा (पुं.)

अम्हाणं = आमचा, आमची, आमचे

एयाए = हिचा (स्त्री.)

## (1) दर्शक सर्वनामे व विभक्ती

1) एय (एतद) = हा, ही, हे 2) इम (इदम्) = हा, ही, हे 3) अमु (अदस्) = हा, ही, हे

### एय (एतद्) हा (पु.)

| कारक | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | एस, एसो | एए |
| कर्म (द्वि.) | एयं | एए |
| करण (तृ.) | एएण, एएणं | एएहि, एएहिं |
| संप्रदान (च./ष.) | एयस्स | एयाण, एयाणं |
| अपादान (पंचमी) | एयाओ | एएहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | एयंसि, एयम्मि | एएसु, एएसुं |

### एय (एतद्) स्त्री (ही)

| कर्ता (प्र.) | एसा | एया, एयाओ, एईओ |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | एयं | एयाओ, एईओ |
| करण (तृ.) | एयाए | एयाहि, एयाहिं |
| संप्रदान (च./ष.) | एयाए | एयाण, एयाणं |
| अपादान (पंचमी) | एयाओ | एयाहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | एयाए | एयासु, एयासुं |

### इम (इदम्) पु. (हा)

| कर्ता (प्र) | अयं, इमो, मे | इमे |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | इमं | इमे, इमा |
| करण (तृ.) | इमेणं, इमिणा, | इमेहि, इमेहिं |
| संप्रदान (च./ष.) | इमाए | इमाण, णं |
| अपादान (पंचमी) | इमाए | इमाहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | इमाए | इमासु, सुं. |

### इम (इदम्) स्त्री (ही)

| कर्ता (प्र) | इयं, इमा | इमा, इमाओ, इमी |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | इमं | इमा, इमाओ, इमी |
| करण (तृ.) | इमाए, इमीए | इमाहि, हिं, इमीहि |
| संप्रदान (च./ष.) | इमाए, इमीए, इमीसे | इमासिं, इमाणं, इमं |
| अपादान (पंचमी) | इमाओ, इमीओ | इमाहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | इमाए, इमीए, इमीसे | इमासु, इमासुं, इमं |

**टीप :-** 'अमु' या दर्शक सर्वनामाची रूपे प्राकृतात विशेष आढळत नाहीत. 'साहु' या उकारान्त पुलिंगी नामाप्रमाणे 'अमु' ची रूपे होतात. तरीही प्रथमा, द्‌वितीया आणि सप्तमीची रूपे खालीलप्रमाणे होतात.

| कर्ता (प्र.) | अह, अमू, असो | अमुणो, अमू |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | अमुं | अमुणो, अमू |
| अधिकरण (सप्तमी) | अयम्मि, इअम्मि, अअुम्मि | अमूसु , अमु |

## (2) संबंधदर्शक सर्वनामे

1) ज (यद्) = जो, जी, जे

### ज (यद्) पु. (संबंधदर्शक सर्वनामे)

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | जो | जे |
| कर्म (द्वि.) | जं | जे, जा |
| करण (तृ.) | जेण, जेणं | जेहि, जेहिं |
| संप्रदान (च./ष.) | जस्स | जेसिं, जाण, जाणं |
| अपादान (पंचमी) | जाओ | जेहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | जंसि, जम्मि | जेसु, जेसुं |

### ज (यद्) स्त्री. (जी)

| कारक | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | जा | जाओ, जीओ |
| कर्म (द्वि.) | जं | जाओ, जीओ |
| करण (तृ.) | जाए, जीए | जाहि, जाहिं, जीहि |
| संप्रदान (च./ष.) | जाए, जाओ, जीए, जीसे | जासिं, जाण |
| अपादान (पंचमी) | जाओ, जीओ | जाहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | जाए, जीए, जीसे | जासु, सुं |

## (3) प्रश्नार्थक सर्वनामे

### 1 क (किम्) पु. (कोण)

| कर्ता (प्र.) | को, को | के |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | कं | के, का |
| करण (तृ.) | केण, केणं | केहि, केहिं |
| संप्रदान (च./ष.) | कस्स | केसिं, काण, काणं |
| अपादान (पं.) | काओ | केहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | कंसि, कस्सिं, कम्मि | केसु, केसुं |

### क (किम्) स्त्री (कोण)

| कर्ता (प्र.) | का | काओ, कीओ |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | कं | काओ, कीओ |
| करण (तृ.) | काए | काहि, हिं |
| संप्रदान (च./ष.) | काए | काण, णं |
| अपादान (पं.) | काए, काओ | काहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | काए, कीसे | कासु, सुं |

## (4) सर्वनामांचे विभक्ती प्रत्यय

### अहं (अस्मद्, युष्मद्) = मी, आम्ही

| कर्ता (प्र.) | अहं, हं | अम्हे, वयं |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | मं, ममं, मे | अम्हे, वयं, णे |
| करण (तृ.) | मइ, मए, मे | अम्हेहि, अम्हेहिं |
| संप्रदान (च./ष.) | मम, मे, मह, मज्झ | अम्हाणं, णं, णो |
| अपादान (पं.) | ममाओ, मत्तो | अम्हाओ, अम्हेहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | मइ, मए, ममंसि | अम्हेसु, अम्हेसुं |

### तुं, तुमं (त्वम् – यूयम्) = तुम्हे, तुज्झे

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| कर्ता | तुं, तुमं, तुमे | तुब्भे, तुम्हे, तुज्झे |
| कर्म | तुमं, ते | तुब्भे, तुम्हे, तुज्झे, भे |
| करण (तृ.) | तुए, तुमे, तए, तुमए | तुब्भेहि, तुम्होहि, तुज्झेहि |
| संप्रदान (च./ष.) | तव, ते, तुह, तुम्ह, तुज्झ | तुम्हाण, णं, तुब्भाण, णं |
| अपादान (पं.) | तुमाओ, तुमंतो | तुब्भेहिन्तो, तुम्हेहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | तुमंसि, तुमम्मि, तइ | तुब्भेसु, तुम्हेसु, तुज्झेसुं |

### (तृतीय पुरुषी सर्वनामे)

### सो (सः तद्) = तो (पु.)

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| कर्ता | सो, से, स | ते |
| कर्म | तं | ते, ता |
| करण (तृ.) | तेण, तेणं | तेहि, तेहिं |
| संप्रदान (च./ष.) | तस्स, से, ते | तेसिं, ताण, ताणं |
| अपादान (पं.) | ताओ | तेहिंतो |
| अधिकरण (सप्त.) | तंसि, तम्मि | तेसु, तेसुं |

सा (त- तद्) = स्त्री (ती)

| कर्ता | सा | तीओ, ताओ |
|---|---|---|
| कर्म | ते | तीओ. ताओ |
| करण (तृ.) | ताए, तीए | ताहि, ताहिं, तीहि |
| संप्रदान (च./ष.) | ताए, तीए, तीसे, ताओ | तासिं, ताण, णं, |
| अपादान (पंचमी) | ताओ, तीओ | ताहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | ताए, तीए, तीसे | तासु, तासु |

## (3) काळ (Tense)

प्रत्येक भाषेत वर्तमान, भूतकाळ, भविष्यकाळ असले तरीही प्राकृतमध्ये वर्तमानकाळ आणि भविष्यकाळाचाच अधिक वापर होत असलेला दिसून येतो. प्राकृत भाषेत भूतकाळ फार कमी प्रमाणात वापरला जात असलेला दिसून येतो.

### 1) वर्तमानकाळाचे प्रत्यय (Present Tense)

1) अर्धमागधी - प्राकृत भाषेत मूळ क्रियांना काळाचे प्रत्यय जोडून क्रियापदाची विविध रूपे तयार केली जातात. त्याला धातुसाधिते म्हणून संबोधले जाते.

2) धातूचे (1)अ, (2) आ, ए, ओकारांत असे दोन गट, विभाग आलेले दिसून येतात.

3) धातूच्या अन्त्य अक्षराच्या उच्चारामधून कोणत्या स्वराचा उच्चार होतो त्यावरून त्या धातूचे वर्गीकरण, गट पाडलेले दिसून येतात. उदा. सुण (यातील अंत्य 'ण'च्या उच्चारातून 'अ' स्वराचा उच्चार होतो म्हणून) हा धातू अकारान्त आहे.

**भण** 'अ'कारान्त धातू आहे.

**गा** (याच्या उच्चारात 'आ'स्वर आहे म्हणून) आकारान्त धातू आहे.

**जा** - आकारान्त धातू

**दे** - एकारान्त धातू

**ने** - एकारान्त धातू

**हो** - ओकारान्त धातू

वरील धातूंना वर्तमान, भूतकाळ, भविष्यकाळाचे प्रत्यय जोडून क्रियापदाचे रूप तयार केले जाते.